सांज दैनिक बीड
RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

स्क्रीन रिडरचा बादशहा

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२१ वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है... !

● बीड ● शनिवार, दिनांक ९ मे २०२६ ● वर्ष २१ वे ● पाने : ४ | http://epaper.beedvastav.com | Email : beedvatsav@gmail.com | ● किंमत ३ रुपये

# आईच्या प्रियकराकडून मुलीच्या 19 वर्षीय प्रियकराचा खून; दोघे अटकेत

**मुलीच्या प्रेमप्रकरणाला आईचा विरोध असल्याने आईच्या प्रियकराने मुलीच्या 19 वर्षीय प्रियकराचा चाकू व चॉपरने वार करून खून**

**तरुणावर हल्ला होत असताना त्याला वाचवण्यासाठी आलेल्या मित्रांवरही आरोपींनी जोरदार हल्ला केल्याने ते ही झाले गंभीर जखमी**

**अखेर मुलीच्या प्रेमप्रकरणाला विरोध करणाऱ्या आईच्या प्रियकराने 19 वर्षीय तरुणाची हत्या केल्याने पुणे शहरात एकच खळबळ उडाली !**

## विचित्र नात्यांचा गुंता असलेल्या या थरार घटनेची जोरदार चर्चा



**पुणे : प्रतिनिधी**
मुलीच्या प्रेमप्रकरणाला आईचा विरोध असल्याने आईच्या प्रियकराने मुलीच्या 19 वर्षीय प्रियकराचा चाकू आणि चॉपरने वार करून खून केला. या हल्ल्यात आणखी एक तरुण गंभीर जखमी झाला. ही घटना थेरगाव येथे गुरुवारी रात्री अकराच्या सुमारास घडली. यामध्ये 19 वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. त्याचा मित्र जखमी झाला आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली असून त्यांना न्यायालयात हजर केले असता पाच दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. मृत तरुणाच्या वडिलाने काळेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



### मुलीच्या प्रेम प्रकरणाला आईचा तिव्र विरोध

● काळेवाडी ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र बहिरट यांनी याबाबत माहिती दिली. मृत तरुण आणि एका तरुणीमध्ये प्रेमसंबंध होते. मात्र, या संबंधाला त्या तरुणीच्या आईचा तीव्र विरोध होता.

● एक आरोपी हा तरुणीच्या आईचा प्रियकर आहे. त्याने तरुणाला या प्रेमसंबंधातून बाजूला होण्यास सांगितले होते. याच कारणावरून त्यांच्यात वाद सुरु होता.

### चाकू व चॉपरने तरुणाच्या हातावर, पोटावर आणि मानेवर केले सपासप वार

● शुक्रवारी रात्री अकराच्या सुमारास थेरगावमध्ये आरोपींनी तरुणाला गाठले. त्यांच्यात पुन्हा वाद झाला आणि त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. रागाच्या भरात आरोपींनी जवळ असलेल्या चाकू आणि चॉपरने तरुणाच्या हातावर, पोटावर आणि मानेबर सपासप वार केले. त्याला वाचवण्यासाठी आलेल्या मित्रावरही आरोपींनी हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले. यात प्रियकर तरुणाचा मृत्यु झाला. काळेवाडी पोलीस तपास करीत आहेत.

### रावेत : कॅफेमध्ये अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

● रावेत येथील एका कॅफे मध्ये अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. पीडित मुलीने घटनेच्या २० दिवसानंतर पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली असता या प्रकरणाला वाचा फुटली आहे. ही घटना १८ एप्रिल रोजी दुपारी रावेतमधील एका कॅफेमध्ये घडली. याप्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीने रावेत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार १७ वर्षीय मुलाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्पवयीन मुलाने पीडित अल्पवयीन मुलीला रावेत येथील एका कॅफे मध्ये नेले. तिथल्या एका खोलीत नेऊन त्याने मुलीवर लैंगिक अत्याचार केला. मुलीने ७ मे रोजी पोलीस ठाण्यात येऊन याबाबत माहिती दिली असता भारतीय न्याय संहिता, पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# पाटेगाव येथील टेंडरधारकाने सर्व नियमांना फाट्यावर मारले

## सूर्यास्तानंतर ही बिनधास्त वाळू उपसा व वाहतूक

**➤ पैठण : सर्जेराव खडसन**
पैठण तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेतात येत असलेल्या पाटेगाव येथील वाळू पट्ट्यांचा मागील महिन्यात अधिकृत लिलाव झाला. परन्तु लिलाव झाल्या पासूनच येथे शासनाने घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन होत आहे. सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत वाळू उपशाची परवानगी असताना संबंधित टेंडर धारक सूर्यास्तानंतर ही अवैधरित्या वाळू उपसा करून वाहतूक करत आहे. महसूल व पोलीस प्रशासन या धक्कादायक बाबीकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचे निदर्शनात येत आहे.

शासन नियमानुसार वाळू घाटातून केवळ सूर्योदय ते सूर्यास्तापर्यंतच वाळू काढता येते. परंतु पाटेगाव येथील टेंडरधारकाने सर्व नियमांना फाट्यावर मारतमहसूल व पोलिस प्रशासनासोबत छुपी आर्थिक मैत्री करत सूर्यास्ता नंतर ही विविध यंत्रांचा वापर करून प्रचंड प्रमाणात वाळू उपसा करून वाहतूक करून शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलास चुना लावत आहे.– क्षम

**तेपेक्षा जास्त वाळू भरणा करून विना नंबरची शेकडो वाहने रस्त्यावर :**
या घाटावरून वाळू वाहतुक करणाऱ्या वाहनांची सर्व कागदपत्रे तहसील कार्यालयात जमा करून वाळू वाहतूक संबंधी महसूल विभागाची रीतसर परवानगी घ्यावी लागते. परंतु महसूल विभागाने मोडकळीस आलेले ● पान ४ वर ...





# लिंबागणेश मुख्यचौक पुन्हा रक्तरंजित; गतिरोधकाअभावी अपघातांची मालिका सुरूच

**रस्ते सुरक्षा समितीच्या आदेशालाही MSRDC कडून केराची टोपली ? ग्रामस्थांचा संताप**








बीड / प्रतिनिधी : तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी अहमदपूर–अहिल्यानगर मार्गावरील लिंबागणेश येथील मुख्यचौकात काल दि.०८ शुक्रवारी रात्री सुमारे पाऊणे नऊ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात घडला. बजाज कंपनीची डिस्कवर दुचाकी आणि सुझुकी कंपनीची स्विफ्ट कार यांच्यात जोरदार धडक होऊन दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. अपघातात त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून घटनास्थळी रक्तचा सडा पडला होता.

स्थानिक नागरिक व प्रत्यक्षदर्शींनी तत्काळ धाव घेत जखमी युवकाला रुग्णवाहिकेद्वारे बीड येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविले. सुदैवाने या अपघातात जीवितहानी टळली असली तरी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, लिंबागणेश मुख्यचौकात वारंवार होत असलेल्या अपघातांमुळे डॉ. गणेश ढवळे आणि हरिओम क्षीरसागर यांच्या पुढाकाराने ग्रामस्थांनी अनेक वेळा आंदोलन करून गतिरोधक बसविण्याची मागणी केली होती. ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर दि.२६ जुन २०२५ रोजी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि रस्ता सुरक्षा समितीचे सचिव कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड रविंद्र तोंडे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी केली होती. या अनुषंगाने त्यांच्या अहवालानंतर जिल्हाधिकारी तथा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष विवेक जॉन्सन यांनी ६ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते ● पान ३ वर ...

**कोणत्याही कार्याला जिद्द महत्त्वाची** ➤ सून सुन्नाबी हिला सुद्धा आपल्या मुली व मुलाप्रमाणेच स्वतःच्या पायावर उभे राहण्याकरिता दिले प्रोत्साहन

# बापाच्या जिद्दीला सलाम! मुलगी, मुलगा आणि सूनही पोलीस दलात



**➤ बीड : एस.एम.युसुफ**
इस्माईल शेख यांची मुलगी शायिस्ता शेख, मुलगा फिरोज शेख आणि सून सून्नाबी शेख हे तिघेही महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस शिपाई म्हणून भरती झालेत. बीड जिल्ह्याच्या शिरूर कासार तालुक्यातील वंजारवाडी सारख्या एका अत्यंत छोट्याशा गावात राहणारे इस्माईल शेख यांनी मोठ्या मेहनतीने व जिद्दीने आपल्या मुली व मुलाला शिक्षण दिले. या दोघांनीही चांगले शिक्षण घेऊन पोलीस भरतीची तयारी केली. भरती निघताच या दोघांचीही महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाली. एवढेच नाही तर सून सुन्नाबी हिला सुद्धा आपल्या मुली व मुलाप्रमाणेच स्वत:च्या पायावर उभे राहण्याकरिता प्रोत्साहन देऊन तिलाही पोलीस भरतीत उभे केले. अन् तिही महाराष्ट्र पोलीस दलात शिपाई पदावर निवडली गेली. इस्माईल शेख यांच्या जिद्दीमुळे मुलगा फिरोज याने बहिणीसह स्वत:च्या पत्नीलाही आपल्या बरोबरीने शिक्षण देऊन पोलीस बनविले. यामुळे पिता–पुत्राची जिद्द व मेहनत वंजारवाडी गावात चर्चेचा विषय ठरली आहे. इस्माईल शेख यांच्या कुटुंबीयांकडून इतरांनी आदर्श घ्यावा. याकरिता त्यांच्या कुटुंबाची कथा या लेखाच्या माध्यमातून वाचकांसमोर थोडक्यात मांडली आहे.

इस्माईल शेख हे नाव घेतलं की डोळ्यासमोर उभा राहतो तो कष्ट, संघर्ष आणि जिद्दीचा प्रवास. वाडीमध्ये आम्ही शाळेत असताना रायमोहा ते वंजारवाडी रिक्षा चालवत संसाराचा गाडा ओढणारा हा माणूस, नंतर पानटपरी टाकून उभा राहिला, वेळ आली तेव्हा ड्रायव्हर म्हणूनही काम केले; पण परिस्थितीसमोर कधीच हार मानली नाही.

हातावर पोट असलं तरी डोक्यात एकच स्वप्न होतं – माझी मुलं शिकली पाहिजेत, मोठी झाली पाहिजेत. त्या स्वप्नासाठी त्यांनी घाम गाळला, कष्ट सोसले, स्वत:च्या इच्छा बाजूला ठेवल्या. आज त्याच मेहनतीच्या बळावर त्यांची दोन्ही मुले पोलीस दलात सेवेत आहेत आणि सूनही पोलिस खात्यात नोकरी करत आहे. ही केवळ एका कुटुंबाची यशोगाथा नाही, तर वाडीमधील प्रत्येकासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे.

मोठेपणा हा पैशात नसतो, तर विचारात, शिक्षणात आणि कष्टात असतो, हे इस्माईल शेख यांनी दाखवून दिलं. आजच्या पिढीने मोबाईलमध्ये वेळ घालवण्यापेक्षा अशा संघर्षातून शिकायला हवं. कारण परिस्थिती कधीच अडथळा नसते, जिद्द नसणे हा खरा अडथळा असतो.

### शेख कुटुंबाचे वास्तव

मुलगी, मुलगा व सून एकाच परीक्षेत पोलीस दलात दाखल होण्याअगोदर हातावरचं पोट. हॉटेल मध्ये काम, ड्रायव्हिंग सह हाती पडेल ते काम करून कुटुंबांची उपजीविका भागविणारे इस्माईल शेख यांच्या कुटुंबातील एक नाही तर तिघांचा पोलीस दलात समावेश झाला आहे.

वंजारवाडी गाव तसे दोन ते तीन हजार लोकसंख्या त्यातून ९०% समाज ऊस तोडी करणारा. गावातील वंजारी समाजाच्या नोकरीचे प्रमाण पाहून शेख कुटुंब कधी गावाचे, वाडीचे कुटुंब झाले कळलेच नाही. गावातील अधिकारी, शिक्षक, फौजी आणि पोलीस मधील सोबतची मुलं–मुली नोकरीला लागतात म्हणून या कुटुंबातील सर्व समावेशक असणाऱ्या फिरोज इस्माईल शेखला ही गोष्ट लक्षात आली आणि त्याने स्वत:सह बहीण व पत्नीलाही प्रोत्साहन देत पोलीस भरती करिता तयार केले. याकरिता त्याने कोणतीही मदत मागितली तरी वंजारवाडी मागे नाही हटली. आज याच गोष्टीचे फलित म्हणून तिघांना पोलीस विभागात नोकरी मिळाली. गाव सोडून जर इतर ठिकाणी असते तर नक्कीच नोकरी ऐवजी त्यांनी कोणता तरी व्यवसाय केला असता. पण शिक्षणाचे महत्व गावाने दाखवल्याने आज वंजारवाडी गावाचे हे आमचं कुटुंब यशस्वी झाले. सलाम यांच्या कर्तृत्वाला. सलाम इस्माईल चाचा आणि फिरोज यांच्या सहनशक्तीला आणि नतमस्तक आम्ही शायिस्ता आणि सुन्नाबी यांच्या धाडसाला मुस्लिम समाजात नोकरीचे प्रमाण कमी. तरी संगत अभ्यासू पोरांची असल्याने ही पोरं आज कुटुंबातील नोकरदार बनली. वंजारवाडीत पहिले कुटुंब ज्यात एकाच भरतीत तिन्ही पोलीस झाले

## आजचे राशि भविष्य

### मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# कन्नड कृषी विभागाच्या आमराईला उच्चांकी दर; १३.२५ लाखांची बोली

कन्नड / प्रतिनिधी : कन्नड तालुक्यातील नरसिंगपूर येथील कृषी विभागाच्या फळ रोपवाटिकेतील आमराईला यंदा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत इतिहासातील सर्वाधिक १३ लाख २५ हजार रुपयांची बोली लागली आहे. मागील वर्षी केवळ २ लाख ८२ हजारांवर थांबलेली बोली यंदा तब्बल पाचपट वाढल्याने हा लिलाव विशेष चर्चेचा विषय ठरला आहे.

या लिलावात आंबा व्यापारी इस्माईल इब्राहिम शेख यांनी सर्वाधिक बोली लावत आमराई आपल्या नावावर केली. सिल्लोड येथील उपविभागीय कृषी अधिकारी सुभाष आघाव यांच्या अध्यक्षतेखाली हा जाहीर लिलाव पार पडला.

नरसिंगपूर येथील जिल्हा मध्यवर्ती फळ रोपवाटिकेचे एकूण क्षेत्र १५२ एकर असून, त्यापैकी २५ एकरात फळ रोपवाटिका आणि १२७ एकरात बीजगुणन केंद्र आहे. या रोपवाटिकेत १७० रायवळ आंब्याची झाडे असून, त्यातील १२४ झाडांना यंदा फळधारणा झाली आहे. लिलावात तालुक्यातील २४ व्यापाऱ्यांनी सहभाग घेतला. शासकीय सर्वेक्षणानुसार अंदाजे १८ लाख ४२ हजार ९६० रुपयांची अपेक्षित रक्कम होती. मात्र विविध नैसर्गिक कारणांमुळे अपेक्षित रक्कम पूर्णत: साध्य झाली नाही. हा लिलाव यशस्वी करण्यासाठी कृषी अधिकारी एस. जे. वाकळे, सहाय्यक कृषी अधिकारी दिपक पगारे, कृष्णा गुंजाळ, बाबासाहेब दिवेकर, साईनाथ धनेधर यांनी विशेष मेहनत घेतली. एकूणच, कन्नडच्या आमराईने यंदा विक्रम मोडत कृषी विभागासाठी मोठा महसूल उभा केला, तर व्यापाऱ्यांसाठीही हा हंगाम लाभदायी ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.



- **यंदाची बोली** : ₹१३,२५,००० (उच्चांकी)
- **मागील वर्षीची बोली** : ₹२,८२,०००
- **एकूण क्षेत्र** : १५२ एकर
- **आंब्याची झाडे** : १७० (१२४ फलधारणा)
- **लिलावात सहभागी व्यापारी** : २४
- **अपेक्षित रक्कम** : ₹१८.४२ लाख

"मोठे क्षेत्र असल्याने वानरांचा त्रास, वादळ-वाऱ्यांचा परिणाम होतो. नैसर्गिक आपत्ती गृहीत धरून अपेक्षित रकमेवर १०% व इतर खर्च २०% वजा करूनच लिलाव केला जातो. यामुळे अपेक्षित रक्कम पूर्ण मिळाली नाही."
– **एस. जे. वाकळे,** कृषी अधिकारी, नरसिंगपूर

### आमराईतील आंब्यांची वैशिष्ट्ये

● या रोपवाटिकेत विविध प्रकारचे रायवळ आंबे आढळतात. संत्र्या, सोप्या, मोसंब्या, तुप्या, केळ्या, लंगड्या, खोबऱ्या, शेप्या, आखाज्या, मेहताब्या, पायऱ्या, निलम, बेनिशान, शेंद्र्या, छत्र्या, लाल्या असे अनेक प्रकार प्रसिद्ध आहेत. यामध्ये 'तुप्या' आंबा गावरान तुपासारख्या चवीसाठी प्रसिद्ध असून, 'काळ्या' आंब्याला सुगंधामुळे मोठी मागणी आहे.

# अमेरिका - इराण हल्ल्यात भारतीय जहाज बुडाले: एकाचा मृत्यू

होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या ताज्या संघर्षात एका भारतीय मालवाहू जहाजावर गोळीबार झाला. या घटनेत एका भारतीय खलाशाचा मृत्यू झाला, तर इतर १७ खलाशांना वाचवण्यात यश आले. मिळालेल्या माहितीनुसार, हा खलाशी गुजरातच्या द्वारका जिल्ह्यातील जाम सलाया गावचा रहिवासी होता आणि तो दुबईहून येमेनला माल घेऊन जात होता.

मृत खलाशाची ओळख अल्ताफ तलाब केर अशी पटली आहे. 'अल फैज नूर सोलेमानी' या जहाजावर १८ खलाशी असताना गोळीबार झाला, त्यात केर यांचा मृत्यू झाला. दुबईतील भारतीय वाणिज्य दूतावासाने या घटनेची पुष्टी केली असून दु:ख व्यक्त केले आहे.




महावाणिज्य दूतावासाने एक्सवर लिहिले, "या दुर्दैवी घटनेबद्दल आम्हाला तीव्र दु:ख झाले आहे. यामध्ये जहाजावरील एका भारतीय कर्मचाऱ्याचा दु:खद मृत्यू झाला आहे. वाणिज्य दूतावास जहाजाच्या मालकाच्या संपर्कात आहे आणि अधिक माहिती गोळा करत आहे. या प्रकरणात वाणिज्य दूतावास प्राधान्याने सर्वतोपरी मदत करेल."

इंडियन सेलिंग व्हेसल्स असोसिएशनचे सरचिटणीस, आदम भाया यांनी सांगितले की, जहाज होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जात असताना ही घटना घडली. हल्ल्याच्या वेळी अल्ताफ केर जहाजाच्या इंजिन रूमजवळ होते. जहाजाचे मोठे नुकसान झाले आणि ते बुडू लागले. भाया यांनी सांगितले की, 'प्रेम सागर' नावाचे दुसरे जहाज घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी उर्वरित १७ कर्मचाऱ्यांची सुटका केली. सर्वांना दुबईला आणण्यात आले. भाया यांनी दुबईतील भारतीय वाणिज्य दूतावासाला एक पत्र लिहिले आहे. या पत्रात म्हटले आहे की, या घटनेमुळे खलाशी समुदाय आणि मृतांच्या कुटुंबीयांमध्ये प्रचंड भीती आणि दु:ख पसरले आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले की, अशा परिस्थितीत एका निष्पाप भारतीय खलाशाचा मृत्यू होणे ही अत्यंत दु:खद घटना असून, याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

# दिल्लीत होणार महत्त्वाची बैठक, पगारवाढीसह 'या' मागण्यांवर चर्चा

नवी दिल्ली : केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. आठव्या वेतन आयोगाच्या हालचालींना आता वेग आला असून संरक्षण मंत्रालय, रेल्वे आणि इतर केंद्रीय विभागांतील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांवर चर्चा करण्यासाठी दिल्लीमध्ये महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीकडे लाखो सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांचे लक्ष लागले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आठवा वेतन आयोग १३ आणि १४ मे रोजी दिल्लीमध्ये कर्मचारी संघटना, युनियन आणि पेन्शनधारक प्रतिनिधींशी चर्चा करणार आहे. या बैठकीत कर्मचाऱ्यांच्या वेतनरचनेपासून ते भत्ते, फिटमेंट फॅक्टर आणि पेन्शन सुधारणा अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा होणार आहे.




कोणत्या मुद्द्यांवर होणार चर्चा?

या बैठकीत कर्मचारी संघटना सरकारसमोर अनेक महत्त्वाच्या मागण्या मांडणार आहेत. त्यामध्ये मूळ वेतनात मोठी वाढ, फिटमेंट फॅक्टर वाढवणे, महागाई भत्त्याची नव्याने गणना, प्रमोशनल इन्क्रिमेंट, तसेच निवृत्तीवेतनधारकांसाठी सुधारित पेन्शन योजना या मुद्द्यांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे, कर्मचाऱ्यांकडून फिटमेंट फॅक्टर किमान २.८६ किंवा त्यापेक्षा जास्त ठेवण्याची मागणी होण्याची शक्यता आहे. जर ही मागणी मान्य झाली, तर लाखो कर्मचाऱ्यांच्या पगारात मोठी वाढ होऊ शकते. त्यामुळे या बैठकीकडे सरकारी कर्मचाऱ्यांचे विशेष लक्ष लागले आहे.

बैठकीसाठी ऑनलाइन अर्ज अनिवार्य :

आयोगाने स्पष्ट केले आहे की, बैठकीत सहभागी होण्यासाठी कर्मचारी संघटना आणि युनियनना अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करणे बंधनकारक राहणार आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख १० मे २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

अर्ज करताना मेमो आयडी सादर करणे आवश्यक असून विहित प्रक्रिया पूर्ण केलेल्या संघटनांनाच बैठकीस उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार आहे. त्यामुळे अनेक संघटनांनी तयारीला सुरुवात केली आहे.

पुढील १८ महिन्यांत अहवाल?

आठव्या वेतन आयोगाला आपला अंतिम अहवाल सादर करण्यासाठी सुमारे १८ महिन्यांचा कालावधी देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. आयोगाच्या शिफारशी मंजूर झाल्यानंतर नवीन वेतनरचना आणि सुधारित पेन्शन लागू होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, भविष्यातही दिल्लीमध्ये अशाच प्रकारच्या बैठका आयोजित केल्या जाणार असून त्याबाबतची माहिती आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यामुळे सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांनी आयोगाच्या पुढील निर्णयांकडे लक्ष ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आठव्या वेतन आयोगामुळे केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात मोठी वाढ होणार का, याकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# कोळी बोडखा येथील तरुणाचा घनसावंगी जवळ दुचाकी अपघात मृत्यू तर आई गंभीर

पाचोड / प्रतिनिधी : लग्न सोहळ्यास उपस्तित राहण्यासाठी जात असतांना विरुद्ध दिशेने येणाऱ्या भरधाव वेगातील दुचाकीने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरात धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघात एका तरुणाचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर पाठीमागे बसलेली त्याची आई गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी दिनांक ८ दुपारी घनसावंगी तीर्थपुरी रस्त्यावर घडली.



नविद रियाज (मामू) पटेल वय १९ रा. कोळी बोडखा ता. पैठण तर अजम चांदखा पठाण वय २७ रा. घनसावंगीअसे अपघातात मयत झालेल्या तरुणांचे नाव आहेंत.

या अपघाता विषयी अधिक माहिती अशी कीं, कोळी बोडखा येथील नविद पटेल हे आपल्या आई सोबत दुचाकी क्रमांक (एम एच २० ई. एम -७६३५) वरून नातेवाईकांच्या लग्न सोहळाला हजर होण्यासाठी जात होते. दरम्यान घनसावंगी जवळ येताच समोरून वेगात येणाऱ्या आणि या जाणाऱ्या दुचाकीची समोरासमोर जोरदार धडक झाली यात दोन्ही दुचाकी चालकांच्या डोक्याला जबर मार लागल्याने आणि मोठ्या प्रमानात रक्तश्राव झाल्याने दोघांचा घटनास्थळी मृत्यू झाला तर इम्रानाबी रियाज पटेल वय ४० हा गंभीर जखमी झाला त्याला तातडीने घनसावंगी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मयत नविद हा अविवाहित होता तर घनसावंगी येथील अमजद पठाण हा विवाहीत होता त्याच्या पच्यताप दोन लहान मुले आहेत. दोन्ही मयतावर घनसावंगी येथील ग्रामीण रुग्णालयात शवविछेदन करून मृत्यूदेह नातेवाईकांना देण्यात आले. या दुर्देवी घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहें.

# "स्वाभिमान दिनानिमित्त समाजसेवेचा महामेळा" — ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणीत रक्तदान शिबिरासह विविध सामाजिक उपक्रम

वडवणी / प्रतिनिधी : वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त (स्वाभिमान दिनानिमित्त) रविवार, दि. १० मे २०२६ रोजी सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, वडवणी येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी जपत समाजोपयोगी उपक्रमांद्वारे बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस साजरा करण्याचा संकल्प या माध्यमातून करण्यात आला आहे.

स्वाभिमान दिन हा बहुजन समाजासाठी प्रेरणा, संघर्ष आणि सामाजिक परिवर्तनाची जाणीव करून देणारा दिवस मानला जातो. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरातून समाजातील गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचा संदेश देण्यात येणार आहे. रक्तदान हे श्रेष्ठ दान मानले जाते आणि या माध्यमातून अनेकांचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे या उपक्रमाला परिसरातील युवक, कार्यकर्ते आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. याच बरोबर पसायदान सेवा प्रकल्प येथे विद्यार्थ्यांना खाऊ वाटप व जीवनावश्यक वस्तू संच वाटप करणार आहे.



बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यात येणार आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली बहुजन समाजात सामाजिक न्याय, स्वाभिमान आणि संविधानिक मूल्यांची जपणूक करण्यासाठी सुरू असलेल्या कार्याचा गौरव या निमित्ताने करण्यात येणार आहे.

वंचित बहुजन युवा आघाडीचे तालुकाध्यक्ष विनोद काकडे यांच्या पुढाकारातून या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युवा आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सामाजिक कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. रक्तदान शिबिरासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि रक्तसंकलनासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

रक्तदानासोबतच समाजात आरोग्याविषयी जनजागृती व्हावी, युवकांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी आणि स्वाभिमान दिनाला समाजसेवेचे अधिष्ठान लाभावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

या रक्तदान शिबिरात वडवणी शहरासह तालुक्यातील सर्व सामाजिक संघटना, युवक मंडळे, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करून समाजसेवेच्या या पवित्र कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

विशेष

# दुर्बल परिस्थितीवर मात करत रागिणी चव्हाणचे दहावीमध्ये घवघवीत यश



**कन्नड / प्रतिनिधी :** तालुक्यातील भीलदरी तांड्यातील रहिवासी असलेल्या रागिणी संजय चव्हाण हिने नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या परीक्षेत ९५.४० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अत्यंत प्रतिकूल आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल परिस्थितीत शिक्षण घेत असताना तिने हे यश मिळवले, ही बाब विशेष कौतुकास्पद ठरत आहे.

रागिणीचे वडील ग्रामीण रोजगार सेवक म्हणून गावात कार्यरत असून, राज्यभरातील रोजगार सेवकांना विविध मागण्यांसाठी आंदोलन करावे लागत असतानाही कुटुंबाने शिक्षणाला प्राधान्य दिले. अशा कठीण परिस्थितीतही रागिणीने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर यशाचा मान पटकावला आहे.

तिच्या या यशामुळे भील दरी तांडा परिसरासह सायगव्हाण, नागद आणि आसपासच्या गावांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. गावकरी आणि नातेवाईकांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, अनेकांनी तिच्या यशाचे कौतुक करत भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. रागिणी चव्हाण हिने परिस्थितीवर मात करत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली असून, तिचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवता येते, हे रागिणी चव्हाण हिने सिद्ध करून दाखवले आहे.

# दहावी बोर्ड परीक्षेत समृद्धी नागरगोजे हिचे ९१ टक्के गुणांसह घवघवीत यश



**बीड / प्रतिनिधी :** वडगाव गुंधा ता. बीड येथील महादेव मोतीराम नागरगोजे व आशा महादेव नागरगोजे यांची कन्या समृद्धी महादेव नागरगोजे हिने दहावी बोर्ड परीक्षेत ९१ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

बीड येथील शिवाजी विद्यालयाची विद्यार्थिनी असलेल्या समृद्धीने सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द व परिश्रमाच्या जोरावर हे यश मिळवले. तसेच विद्यालयातील शिक्षकांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे हे यश शक्य झाल्याची भावना तिने व्यक्त केली.



समृद्धीच्या या यशाबद्दल तिच्यावर आई-वडील, शिक्षक, नातेवाईक व मित्रपरिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# आष्टी तालुक्यात शैक्षणिक डंका!

**पाच विद्यार्थिनींची दहावीच्या परीक्षेत १०० टक्के गुणांसह गगनभरारी**

**एका तालुक्यात 'पाच परी'! १००% गुणांसह आष्टीच्या विद्यार्थिनींची शैक्षणिक विजयगाथा.**




**आष्टी / प्रतिनिधी** दहावीच्या निकालात आष्टी तालुक्याने घवघवीत यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, तालुक्यातील पाच विद्यार्थिनींनी १०० टक्के गुण (बेस्ट ऑफ फाइव्ह) मिळवून जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात तालुक्याचा दबदबा निर्माण केला आहे.

या उत्तुंग यशामध्ये आष्टी येथील वसुंधरा विद्यालयाच्या चार विद्यार्थिनींनी बाजी मारली आहे. यामध्ये अक्षता अनिल नन्नवरे, सिद्धी संदीप पवार, सिद्धी संजू कर्डिले आणि अक्षरा अशोक पवार या चौघींचा समावेश आहे. एकाच शाळेतील चार मुलींनी १०० टक्के गुण मिळवल्याने वसुंधरा विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

तसेच, आष्टी येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेची विद्यार्थिनी सायली बबन उकले हिने देखील १०० टक्के गुण प्राप्त करत आपल्या शाळेचा व कुटुंबाचा नावलौकिक वाढवला आहे. या पाचही रणरागिणींच्या यशाने तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

ग्रामीण भागातील मुलींनी जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश मिळवल्याने त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या विद्यार्थिनींच्या यशाबद्दल संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# गणेश माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा ९३.५४ टक्के निकाल

**प्रतीक्षा पाटेकर प्रथम; श्वेता चौरे द्वितीय तर भाग्यश्री पाटेकर तृतीय**

**माजलगाव : प्रतिनिधी** माजलगाव तालुक्यातील हिवरा बु. येथील गणेश माध्यमिक विद्यालयाने दहावी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेचा एकूण निकाल ९३.५४ टक्के लागला असून परीक्षेला बसलेल्या ३३ विद्यार्थ्यांपैकी २९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

यामध्ये कु. प्रतीक्षा नवनाथ पाटेकर हिने ८४.४९ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. श्वेता राम चौरे हिने ८४.०० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर कु. भाग्यश्री भास्कर पाटेकर हिने ८१.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक संपादन केला. यशस्वी

**महत्वाचे ठळक मुद्दे**

- शाळेचा एकूण निकाल ९३.५४ टक्के
- ३३ पैकी २९ विद्यार्थी उत्तीर्ण
- प्रतीक्षा पाटेकर प्रथम क्रमांक
- श्वेता चौरे द्वितीय, भाग्यश्री पाटेकर तृतीय




विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक बी. एस. सोनवणे, परीक्षा विभाग प्रमुख मुरलीधर साळवे सर, शिक्षक वृंद तसेच पालकांनी अभिनंदन केले.


सांज दैनिक बीड · वास्तव
http://epaper.beedvastav.com


# जवाहर विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**स्नेहा साळवे हिने १०० टक्के गुणांसह पटकावला प्रथम क्रमांक**


स्नेहा नितीन साळवे 100


विद्या गणेश सोळंके 99.40


प्रतिक रामराव पवार 95.00


उत्कर्षा उत्तम वाले 92.20


ज्ञानेश्वरी कल्याण जगताप 92.00

**माजलगाव : प्रतिनिधी** माजलगाव / प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेत केसापुरी वसाहत येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ८०.१३ टक्के लागला.


यामध्ये स्नेहा नितीन साळवे हिने १०० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच विद्या गणेश सोळंके हिने ९९.४० टक्के, प्रतिक रामराव पवार याने ९५ टक्के, उत्कर्षा उत्तम वाले हिने ९२.२० टक्के तर ज्ञानेश्वरी कल्याण जगताप हिने ९२ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल नवविकास मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस.आर. शर्मा, कार्यवाह तथा माजी शिक्षक आमदार डी.के. देशमुख, उपाध्यक्ष ॲड. आर.डी. भिलेगावकर, सहकार्यवाह आर.बी. देशमुख, संचालक तथा शालेय समितीचे अध्यक्ष शिरीष देशमुख, संचालक तथा नगरसेवक डॉ. सचिन देशमुख, राहुल मुळी, मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते व पर्यवेक्षक मोरेश्वर मसलेकर यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

**महत्वाचे ठळक मुद्दे**

- जवाहर विद्यालयाचा दहावीचा निकाल ८०.१३ टक्के
- स्नेहा साळवे हिला १०० टक्के गुण
- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी
- यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव

# छत्रपती शिवाजी विद्यालयाचे दहावी बोर्ड परीक्षेत यश



**माजलगाव / प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी - मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेत येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले असून शाळेचा निकाल ६६.२६ टक्के लागला आहे.


शाळेची विद्यार्थीनी सय्यद मारिया गुलाब ८२ टक्के गुण घेऊन प्रथम, गायत्री भागवत भोसले ७८.४० टक्के गुण घेऊन द्वितीय तर सृष्टी विजय गंधनवार ७४.४० टक्के गुण मिळवून तृतीय आली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार राधाकृष्ण पाटील, सतीश दुगड, सचिव माजी नगराध्यक्ष अशोक होके पाटील, ईनायत खान पठाण, डॉ. योगिता होके पाटील, अभय होके पाटील, मुख्याध्यापक मनोज सोळंके, भास्कर पारगावकर, बालासाहेब झोडगे, विष्णू गडकर, मुरलीधर भाळशंकर, आप्पासाहेब होके, माधव घोलप, अनंत शेजुळ, अनंत राठोड, सय्यद गयास, दत्तात्रय इंगळे, मिलिंद देशपांडे, सत्यप्रिया होके पाटील, फरजाना पठाण, तुळशीराम साळवे, पंकज कळसकर, शेख शहानुर, ज्ञानेश्वर पवार, स्मिता डाके, शिल्पा शिनगारे, सारीका टाकणखार, प्रथमेश लांडगे, विशाल राजपूत, दत्ता पांडे, दिनकर काळे यांनी अभिनंदन केले आहे.

# दहावी बोर्ड परीक्षेत कु. तुषार कोटुळे यांची दैदिप्यमान कामगिरी



**वडवणी : प्रतिनिधी** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या दहावी (SSC) बोर्ड परीक्षेच्या निकालात कु. तुषार गणपती कोटुळे यांनी तब्बल ९९ टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या शानदार यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.
तुषार यांनी मराठी विषयात ९१, हिंदी ९५, इंग्रजी ९७, गणित ९५, विज्ञान व तंत्रज्ञान विषयात शंभरपैकी १०० तर सामाजिक शास्त्र विषयात ९३ गुण मिळवले आहेत. विशेष म्हणजे विज्ञान विषयात मिळवलेले शंभर पैकी शंभर गुण हे त्यांच्या मेहनतीचे व अभ्यासातील सातत्याचे प्रतीक मानले जात आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि कुटुंबीय तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन यांच्या जोरावर तुषार यांनी हे उल्लेखनीय यश मिळवले आहे. त्यांच्या या यशामुळे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि शाळेकडून त्यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. भविष्यातही अशीच उज्ज्वल कामगिरी करून मोठे यश संपादन करावे, अशा शुभेच्छा विविध स्तरातून व्यक्त होत आहेत.

# प्रमेय रुईकर ८९.२० गुणांसह दहावी बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण




**गेवराई / प्रतिनिधी** :येथील सेंट झेवियर्स शाळेचे विद्यार्थी प्रमेय प्रशांतराव रुईकर याने ८९.२० इतक्या गुणांसह दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. युवा नेते यशराज भैय्या पंडित यांच्यासह, या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक पीटर खंडागळे सर, दीपक देशपांडे सर, लक्ष्मण सोनवणे सर, मयूर सर वराट सर, बोराडे सर, शिंगणे सर, आदींनी अभिनंदन केले आहे.

# लिंबागणेश मुख्यचौक पुन्हा रक्तरंजित;

● पान १ वरून... विकास महामंडळ (MSRDC) यांना संबंधित ठिकाणी गतिरोधक उभारण्याचे लेखी आदेश दिले होते.

मात्र, आदेशानंतर तब्बल ६ महिने उलटूनही MSRDC विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे "जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशालाच जाणीवपूर्वक केराची टोपली दाखवली जात आहे का?" असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. "या चौकातून दररोज शाळकरी विद्यार्थी, नागरिक आणि वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. प्रशासनाने वेळीच उपाययोजना न केल्यास भविष्यात मोठी जीवितहानी होऊ शकते. त्यास जिल्हा प्रशासन आणि MSRDC विभाग जबाबदार राहील," असा संतप्त इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# महा जम्बो शब्दकोडे



## आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

## उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंत:करण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंत:करण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

## महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

विशेष



# शिवसेना (शिंदे गट) युवासेना मराठवाडा निरीक्षकपदी ज्योतिराम पाटील

**➤ पैठण/ प्रतिनिधी :**
आमदार विलास भुमरे यांचे खंदे समर्थक तथा शिवसेनेचे कट्टर कार्यकर्ते ज्योतिराम पाटील यांची मराठवाड्यात शिवसेना ( शिंदे गट ) अधिक मजबूत करण्यासाठी युवा सेना मराठवाडा निरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली . याबद्दल युवा सेनेच्या वतीने त्यांचा क्रांती चौक येथे भव्य असा नागरी सत्कार करण्यात आला . शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा .डॉ . श्रीकांत शिंदे, खा .संदीपान भुमरे, आ . अब्दुल सत्तार, आ .विलास भुमरे, युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक व बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली . या सत्कार सोहळ्याच्या सुरवातीस ज्योतिराम पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले . आगामी काळात युवकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोचवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे पाटील यांनी यावेळी सांगितले . ज्योतिराम पाटील यांची युवा सेनेच्या मराठवाडा निरीक्षकपदी निवड झाल्याने पैठण तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे .



# केतन काकडे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

आष्टी/ प्रतिनिधी : विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य करत असताना विविध असे, सृजनशील शैक्षणिक उपक्रम राबवत आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडण्याचा वसा हाती घेऊन, त्यांच्यामध्ये समरस होणाऱ्या शैक्षणिक कार्याची दखल घेत . . !जिजाऊ ब्रिगेड व तानुबाई बिरजे पत्रकार परिषद यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित केलेल्या आष्टी ता .आष्टी जि .बीड येथील कार्यक्रमांमध्ये श्रीमती .प्राजक्तताई धस ( संचालिका महानंद दूध संघ मुंबई )व इतर मान्यवरांच्या हस्ते उपक्रमशील शिक्षक श्री . केतन काकडे सर यांचा “आदर्श शिक्षक पुरस्कार” देऊन त्यांच्या कार्याचा गौरव उपस्थित मान्यवरांनी केला . ते सध्या शासकीय माध्यमिक आश्रम शाळा सुरडी ता .आष्टी जि .बीड या शाळेवर कार्यरत आहेत .यापुढेही आपल्या हातून असेच शैक्षणिक ज्ञानदानाचे कार्य घडत राहो . . !अशी आकांक्षा . . ! मान्यवरांकडून व्यक्त करण्यात आली .श्री केतन काकडे सर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे आदिवासी विकास विभागातील अधिकारी श्रीमती .चेतना मोरे मॅडम( प्रकल्प अधिकारी छ .संभाजीनगर ), मुख्याध्यापक व शिक्षक तसेच, त्यांच्या मित्र परिवार– नातेवाईक यांनी अभिनंदन करून, असेच शैक्षणिक कार्य करण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत .



# माहेश्वरी युवा संघटनेच्या अध्यक्षपदी रोहित नावंदर

**➤ माजलगाव : प्रतिनिधी**
माजलगाव तहसील माहेश्वरी युवा संघटनेच्या वतीने दि . ४ मे रोजी आयोजित बैठकीत सन २०२६ –२०२९ या सत्रासाठी नवीन कार्यकारिणीच्या निवडीची प्रक्रिया पार पडली . या बैठकीस माजलगाव तहसील माहेश्वरी युवा संघटनेच्या सन २०२३ –२०२६ सत्रातील अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष तसेच माजलगाव तहसील माहेश्वरी सभेच्या सन २०२६ –२०२९ सत्रातील नवनिर्वाचित अध्यक्ष विनोद बजाज, सचिव पुरुषोत्तम करवा, कोषाध्यक्ष व सहसचिव यांची प्रमुख उपस्थिती होती . याशिवाय महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी युवा संघटनेचे कार्यकारिणी सदस्यही उपस्थित होते . या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत व एकमताने माजलगाव तहसील माहेश्वरी युवा संघटनेच्या सन २०२६ –२०२९ सत्रासाठी अध्यक्षपदी युवा साथी रोहित रामबिलासजी नावंदर यांची निवड करण्यात आली .

रोहित नावंदर यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून आनंद व्यक्त करण्यात येत असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे . त्यांच्या नेतृत्वाखाली संघटना अधिक सक्षम, संघटित व कार्यक्षम बनेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला . माजलगाव तहसील माहेश्वरी समाजाच्या वतीने नवनिर्वाचित अध्यक्ष रोहित रामबिलासजी नावंदर यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत . तसेच, अधिकाधिक युवकांना संघटित करून समाजहितासाठी कार्यरत, मजबूत व गतिमान संघटना उभी करण्याची अपेक्षा समाजाकडून व्यक्त करण्यात आली आहे .

ई पेपर वाचा
• सांज दैनिक बीड • वास्तव
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com







# कर्तव्याबरोबर निसर्गसेवा; हातनूर पोलिसांची फुललेली फळबाग

**➤ कन्नड : विशाल भालेराव**
कन्नड तालुक्यातील हातनूर पोलीस चौकी परिसरात पोलिस कर्मचाऱ्यांनी राबवलेल्या अनोख्या उपक्रमामुळे परिसर हिरवाईने नटला असून, येथे साकारलेली फळबाग सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे . कर्तव्य पार पाडताना निसर्गसेवेची जोड देत पोलिसांनी निर्माण केलेले हे हरित नंदनवन प्रेरणादायी ठरत आहे .

वाढत्या उन्हाच्या तीव्र झळा जाणवत असताना ही फळबाग नागरिकांसाठी थंडावा देणारे आश्रयस्थान ठरत आहे . केवळ विश्रांतीचे ठिकाण म्हणून नव्हे, तर मन :शांती देणारे “निसर्गमंदिर” म्हणूनही या जागेकडे पाहिले जात आहे .

या उपक्रमांतर्गत तब्बल ७७ प्रकारची झाडे लावण्यात आली आहेत . पिंपळ, वड, जांभूळ, जायफळ यांसारख्या औषधी व पर्यावरणपूरक वृक्षांबरोबरच आंबा, चिकू यांसारखी फळझाडेही बहरली आहेत . पोलिस कर्मचाऱ्यांनी केलेल्या नियमित मशागतीमुळे संपूर्ण परिसर हिरवागार बनला आहे .

उन्हाळ्यात वाढणाऱ्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर झाडांची सावली हीच नागरिकांसाठी नैसर्गिक दिलासा ठरत आहे . या झाडांमुळे वातावरणातील प्रदूषण कमी होऊन ऑक्सिजनचे प्रमाण वाढण्यास मदत होत आहे . तसेच फळझाडांमुळे अन्नसुरक्षेलाही हातभार लागतो . अशा प्रकारच्या पर्यावरणपूरक उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचत असून, “निसर्ग आणि समाज यांचा सुंदर संगम” या फळबागेतून साकार झाल्याचे चित्र दिसून येत आहे . भविष्यातील पिढ्यांसाठी हरित वारसा जपण्याच्या दृष्टीने हा उपक्रम आदर्श ठरत आहे .

### महत्वाचे ठळक मुद्दे
● ७७ प्रकारची झाडे — औषधी व फळझाडांचा समावेश
● कडक उन्हात प्रवाशांसाठी थंडावा व विश्रांतीची सोय :● प्रदूषणात घट, ऑक्सिजनमध्ये वाढ ● पर्यावरण संवर्धनाचा आदर्श उपक्रम
● काही क्षण घालवले तरी मन :शांतीचा अनुभव

# पैशाचा हवाला घेणाऱ्यांनो सावधान!

## ➤ आंबा तांडा येथे दोघांनी एकास बदडले!!

**➤ कन्नड/प्रतिनिधी :**
एकाने दुसऱ्याला हातउसने दिलेले पैसे मागायला गेल्यानंतर मध्येच तिसऱ्याने त्या पैशाचा हवाला घेतला मात्र हवाला घेतल्यानंतरही वेळेवर पैसे परत न केल्याने दोघा जणांनी मिळून एकास मारहाण करून जखमी केल्याची घटना कन्नड तालुक्यातील आंबा तांडा येथे बुधवार ६ मे २०२६ रोजी घडली असून या प्रकरणी दोघांविरोधात कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

या संदर्भात कन्नड ग्रामीण ठाण्यातून मिळालेली अधिक माहिती अशी की, रायमल पेलाद राठोड ( ४५ )राहणार आंबा तांडा ( कन्नड ) यांनी दिलेल्या फिर्यादित म्हणले आहे की, बुधवार ६ मे रोजी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास ते त्यांच्या घरासमोर बसलेले असताना गावातील संजय किसन या दोघांनी संगनमत करून रायमल पेलाद राठोड यांना शिवीगाळ करत शामराव केशव जाधव याने हातातील दगडाने डोक्याच्या डाव्या बाजूला मारून दुखापत केली तर संजय किसन जाधव याने फिर्यादीस ट्रॅक्टरवरून खाली ओढून डाव्या पायास दुखापत केली आहे .

अशा आशयाच्या फिर्यादीवरून कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात सहायक फौजदार पठाण यांनी वरील आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून सहायक पोलिस निरीक्षक डॉ . रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार चव्हाण हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत .



# शासनाच्या योजना जनतेच्या दारी पोहोचवा

## उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांचे आवाहन

**➤ छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप**

**➤ कन्नड / प्रतिनिधी :**
केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे ही प्रशासनाची जबाबदारी असून, समाजसेवेच्या भावनेतून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडावीत, असे आवाहन उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी केले .

शहरातील शिवाजी महाविद्यालयाच्या इनडोअर हॉलमध्ये आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान टप्पा क्रमांक २ अंतर्गत उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते .

यावेळी त्यांनी तलाठी, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यस्थळी नियमित हजर राहून जनतेची कामे वेळेत पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देश दिले .

कार्यक्रमाला तहसीलदार सारिका भगत, प्रशिक्षणार्थी उपजिल्हाधिकारी लता बागुल, वैद्यकीय अधिकारी डॉ . अनिरुद्ध गायकवाड, कार्यकारी अभियंता रमेश वाघचौरे, उपअभियंता विकास राठोड, मुख्याधिकारी रविंद्र लांडे, तालुका कृषी अधिकारी संदीप सिरसाठ, नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . तसेच नगराध्यक्षा फरीन बेगम, माजी नगराध्यक्ष जावेद सेठ, पोलीस निरीक्षक रंगराव सानप यांच्यासह अनेक मान्यवरांचीही उपस्थिती होती .

या प्रसंगी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी शासनाच्या योजनांबाबत मार्गदर्शनपर भाषणे केली . शिबिरादरम्यान विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले .

# कन्नड तालुक्यात रोजगार हमीला ब्रेक; संप, तांत्रिक अडचणींनी कामे ठप्प!

**➤ कन्नड / प्रतिनिधी :**
मजुरांच्या हाताला कामाची हमी देणारी आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी महत्त्वाची ठरणारी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना ( मग्रारोहयो ) कन्नड तालुक्यात सध्या अक्षरश : ठप्प झाल्याचे चित्र आहे . विविध संप, तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय विस्कळीतपणामुळे या योजनेला “घरघर” लागली असून, लाभार्थी शेतकरी आणि मजूर दोघेही मोठ्या अडचणीत सापडले आहेत . या योजनेअंतर्गत सिंचन विहिरी, गायगोठा, वृक्षलागवड यांसारखी वैयक्तिक लाभाची कामे तसेच मातोश्री पाणंद रस्ते यांसारखी सार्वजनिक कामे केली जातात . सिंचन विहिरींमुळे कोरडवाहू जमीन बागायतीत रूपांतरित होऊन उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा असते . वृक्षलागवडीत आंबा, शेवगा, पेरू, चिंच यांसारख्या झाडांमुळे पर्यावरण संतुलनासोबतच शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत मिळतो . तर पाणंद रस्त्यांमुळे शेतरस्ते मजबूत होऊन वाद कमी होण्यास मदत होते .

मात्र, जानेवारी ते पावसाळ्यापूर्वीचा कामांचा हंगाम असतानाच सततचे संप आणि तांत्रिक अडचणींनी कामांवर मोठा परिणाम झाला आहे . नोव्हेंबर– डिसेंबर २०२५ मध्ये बीडीओंची डीएससी बंद होती . त्यानंतर फेब्रुवारी २०२६ मध्ये तांत्रिक सहाय्यक संपावर गेले . मस्टर पडताळणी करणारे कनिष्ठ अभियंतेही संपात सहभागी झाले . संप संपल्यानंतरही लॉगिन व पासवर्डच्या अडचणींमुळे ई–पडताळणी होऊ शकली नाही .



### महत्वाचे ठळक मुद्दे
● यातच सिंचन विभागाच्या कनिष्ठ अभियंत्यांकडे कन्नड आणि खुल्ताबाद या दोन तालुक्यांचा कार्यभार असल्याने वेळेत कामे पूर्ण होऊ शकली नाहीत .
● परिणामी तब्बल ५,५०० मनुष्यदिनांचे मस्टर झिरो झाले . सध्या १ एप्रिल २०२६ पासून ग्रामरोजगार सेवक संपावर असल्याने नवीन मस्टर तयार करणेही ठप्प आहे .

### कामांवर टाळे, लाभार्थी संकटात
● मस्टर बंद झाल्यामुळे घरकुलांची कामे अर्धवट राहिली आहेत . सिंचन विहिरी अपूर्ण अवस्थेत आहेत . मंजूर झालेली मातोश्री पाणंद रस्त्यांची कामे सुरूच झालेली नाहीत . सर्वात महत्त्वाचे म्हणजे, १०० दिवसांच्या रोजगाराची हमी देणारी योजना मजुरांच्या हाताला काम देण्यात पूर्णत : अपयशी ठरली आहे .
● या संपूर्ण परिस्थितीमुळे “योजनेचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचू न देणारे जबाबदार कोण ?” असा संतप्त प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत . आता या प्रकरणात जिल्ह्याचे खासदार, तालुक्याचे आमदार, जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि गटविकास अधिकारी काय भूमिका घेतात, कोणावर कारवाई होते का, याकडे संपूर्ण कन्नड तालुक्याचे लक्ष लागले आहे .

# पाटेगाव येथील टेंडरधारकाने सर्व नियमांना फाट्यावर मारले

● पान १ वरून . . . व नियमबाह्य वाहनांना कोणत्या निकषावर परवानगी दिली कळायला मार्ग नाही . यातील अजून एक धक्कादायक प्रकार म्हणजे यातील बहुतांश वाहनांकडे नजर टाकली असता या वाहनांना नंबर प्लेट लावलेली दिसत नाही . एखाद्यावर दिसली तर त्याच्या नंबरवर माती किंवा रंग लावून खाडाखोड केलेली दिसेल .आणि हीच शेकडो वाहने क्षमतेपेक्षा जास्त वाळू भरून सुसाट वेगाने रस्त्यावर धावताना दिसून येत आहे .

**– महसूल प्रशासन व टेंडर धारकात छुप्या पद्धतीचा अर्थपूर्ण’ करार ? :**
तालुका दंडाधिकारी ज्योती पवार, नायब तहसीलदार, सबंधित सज्जाचे मंडळ अधिकारी, तलाठी, कोतवाल आणि पोलिस यंत्रणेच्या नाकावर टिच्चून दिवसरात्र बेसुमार विनापरवाना अवैध्य वाळू वाहतूक चालू आहे . तरीसुद्धा संबंधित यंत्रणा मूग गिळून बसून फक्त याकडे टकमक टकमक पाहत आसल्याने पर्यावरणप्रेमी नागरिकामधे आश्चर्य व्यक्त करून महसूल प्रशासन आणि टेंडर धारकात गोदामात्राला लुटण्याचा काही छुप्या पद्धतीने अर्थपूर्ण करार तर झाला नाही ना ? अशी चर्चा होत आहे .

**जय हो....!!! ➤ बँकॉकमध्ये प्रथम क्रमांक पटकावत देशाचा मान उंचावला**

# आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत कु. प्रणिता गायकवाडचा सुवर्ण विजय

**आष्टी / प्रतिनिधी :**
आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण, ता . आष्टी, जि . बीड येथील मूळ रहिवासी व सध्या कडा, ता . आष्टी, जि . बीड येथे वास्तव्यास असलेले जिल्हा परिषद माध्यमिक शाळा दादेगाव येथील आदर्श माध्यमिक शिक्षक नानासाहेब बुधाजी गायकवाड यांची कन्या कु . प्रणिता नानासाहेब गायकवाड हिने आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत थायलंडमधील बँकॉक येथे प्रथम क्रमांक पटकावत आपल्या गावासह देशाचे नाव उज्ज्वल केले आहे .

कडा येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचालित महावीर इंग्लिश स्कूल ( सीबीएसई ) या शाळेत इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेणारी कु . प्रणिता ही अल्पवयातच नेमबाजी ( पिस्टल व रायफल शूटिंग ) या क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत आहे . तिच्या चिकाटी, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर तिने तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर सलग यश मिळवले असून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी तिने मिळवली होती . कु . प्रणिता हिने आपल्या क्रीडा प्रवासाची सुरुवात आष्टी तालुका स्तरावरील स्पर्धेतून केली . तालुका स्तरावर प्रथम क्रमांक मिळवल्यानंतर तिने बीड येथे झालेल्या जिल्हा स्तरावर तसेच संभाजीनगर येथे झालेल्या विभागीय स्तरावरही प्रथम क्रमांक पटकावत आपली गुणवत्ता सिद्ध केली . पुढे गोवा येथे पार पडलेल्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेतही तिने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवला . या दमदार यशाच्या बळावर तिची भारतीय संघात निवड झाली .



यानंतर थायलंडमधील बँकॉक येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत कु . प्रणिता गायकवाड हिने अफलातून कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आणि भारताचा झेंडा उंचावला . ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थिनीने आंतरराष्ट्रीय स्तरावर अशी भरारी घेतल्यामुळे ती अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे .

कु . प्रणिता हिच्या या यशामागे प्रशिक्षक अहेमद पठाण व वैशाली शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे . तसेच महावीर इंग्लिश स्कूलचे प्राचार्य श्री . अभिलाष सर, शाळेचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व सर्व संचालक मंडळ यांनी तिला सातत्याने प्रोत्साहन व आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या . शाळेने शिक्षणासोबतच क्रीडेलाही तितकेच महत्त्व देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिल्याचे यावरून दिसून येते .
कु . प्रणिता हिच्या या दैदिप्यमान यशामुळे शाळा परिसरासह संपूर्ण कडा, सांगवी पाटण व दादेगाव परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे .

तिच्या या यशाबद्दल आ . सुरेश धस, माजी आ . भीमराव धोंडे, माजी आ . साहेबराव दरेकर, माजी आ . बाळासाहेब आजबे , सभापती शत्रुघ्न मरकड, सरपंच दत्तात्रय खोटे, समाजसेवक समीर शेख यांच्यासह सांगवी पाटण येथील ग्रामस्थ सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ, माध्यमिक शिक्षक संघटनेचे पदाधिकारी तसेच जिल्हा परिषद माध्यमिक शाळा दादेगाव येथील मुख्याध्यापक व शिक्षक वृंद यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत .